| |
|---|
| नि.फौ.ख.क्र. ४२७६/२०२५ |
| सरकार -वि- तौसीफ खान |
| निशाणी क्र. ०७ |

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची शपथेवर सरतपासणी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | हरिनाथ सुखनाथ मेश्राम, |
| **वय** | : | ६७ वर्षे, |
| **धंदा** | : | मजुरी, |
| **राहणार** | : | पावनगाव, पारडी, जिल्हा नागपूर |

**सरकार पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती संगिता गोगे यांचेमार्फत-**

मला साक्षसमन्स प्राप्त झाल्याने मी आज न्यायालयात हजर आहे. पोलीसांनी मला कधीही पंच म्हणून बोलावले नाही. मला घटनास्थळ पंचनामा दिनांक ०३.०६.२०२५ दाखविला त्यावर पंच क्र.२ म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही. सहीपुरता **निशाणी पी-३** देण्यात येते.

**सरकारी अभियोक्तांच्या विनंतीवरुन साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करीत नसल्याने उलट तपासणी घेण्याची परवानगी देण्यात आली. उलटतपास सरकारी अभियोक्तांतर्फे**

२. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०३.०६.२०२५ रोजी मनोज इटकेलवार यांचा बंगला, प्रभा सीटीसमोर, पारडी या ठिकाणी गाय चोरी झाल्याचा घटनास्थळ पंचनामा पोलीसांनी माझ्यासमक्ष केला. मला आता घटनास्थळ पंचनामा दिनांक ०३.०६.२०२५ दाखविला. पोलीसांनी माझ्यासमक्ष केलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी पी-४** देण्यात येते.

**उलट तपास आरोपीतर्फे आरोपीचे विद्वान विधीज्ञ स्वप्नाली वाघ यांचेमार्फत**

३. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनाम्यावरील मजकूर मला माहीत नाही व पोलीसांनी सांगितल्यावरुन मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, जेव्हा पोलीस घटनास्थळी आले तेव्हा मी तेथे हजर नव्हतो.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास – नाही**

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

ANAMIKA DEBASHISH BOSE

Digitally signed by ANAMIKA DEBASHISH BOSE
Date: 2026.02.05 16:23:38 +0530

( **अनामिका दे. बोस** )
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक ०५.०२.२०२६